
Review of ResearCh
ISSN: 2249-894X
Impact Factor : 5.7631(UIF)
Volume - 12 | Issue - 8 | May - 2023

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि आजची स्थिती

अनिकेत रविंद्र उबाळे
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, पनवेल, नवी मुंबई.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारात संसदीय लोकशाही आणि राज्य समाजवाद यांचा समन्वय साधण्यात आला आहे. या दोन संकल्पना परस्परांशी पुरक ठरू शकतात. हा त्यांच्या लोकशाही समाजवादाच्या मुळाशी असलेला विचार आहे. त्यांच्या समाजवादाचा उगम दारिद्र्याविषयी त्यांना असलेल्या अनुभवात आढळतो.भारताच्या आजच्या परिस्थितीमध्ये राज्यसमाजवादाची अत्यंत आवश्यकताआहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या राज्य समाजवादाचा भारतीय संविधानात एक वेगळे अधिष्ठान मिळावे यासाठी अनेकप्रयत्न केले. परंतु तत्कालीन मंत्र्यांना ते मान्य झाले नाही. आजची परिस्थिती पाहता भारताला हाच राज्य समाज वादतारू शकतो. ज्याची संपूर्ण कल्पना बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या राज्य आणि अल्पसंख्यांक या पुस्तिकेत मांडून ठेवली. आजच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीला बाबासाहेब सर्व स्वीयांत्रिकीकरणाला दोषी मनात नाहीत तर दोष इथल्या चुकीच्या समाजरचनेचा आहे असे बाबासाहेब सांगतात. आणि ती समाजरचनाच बदलण्यासाठी प्रयत्नशील राहतात. राज्य समाजवाद हा प्रामुख्याने आर्थिक विचार असून समता प्रस्थापित करण्यासाठी त्याचा स्वीकार करणेकिती आवश्यक आहे याचा सर्वांगाने विचार डॉ बाबासाहेब आंबेडकर करतांना दिसतात.

**मुख्यशब्द (Keywords) :** संसदीयलोकशाही, राज्यसमाजवाद, दारिद्र्य, भारतीयसंविधान, यांत्रिकीकरण, समाजरचना, राज्य आणि अल्पसंख्यांक.

## प्रस्तावना:-

समाजवादया शब्दाची विविध प्रकारे व्याख्या केली जाते.एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस समाजवादी विचारसरणीचा विकास झाला. ज्यासिद्धांतानुसार उत्पादनाची साधने व वितरणाची साधने जनतेच्या मालकीची व्हावीत, त्यासाधनांवर समाजाचे नियंत्रण असावे, समाजाचीसंपत्ती न्याय पद्धतीने वाटली जावी असे सुचवले जाते तो सिद्धांत म्हणजे समाजवाद होय. समाजवाद ही एक तत्त्वप्रणाली आहे ज्यात सामाजिक आणि आर्थिक समता व सहकार्य वाढवण्यासाठी समाजातील संपत्तीची वाटणी व मालमत्ता ह्यांचे समाजाकडून नियमन करणे हे ध्येय असते. हे नियमन कामगार समिती सारख्या प्रत्यक्ष पद्धतीने असू शकते, अथवा सरकारने केलेले अप्रत्यक्ष नियमन असू

शकते. समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादनाच्या साधनांची मालकी ही वैयक्तिक नसून सर्व समाजाची अथवा देशाची मिळून असते.1

नंतरच्या काळात समाजवादाची अनेक स्वरूपे आपल्याला पाहायला मिळतात. त्यामध्ये प्रमुख दोन प्रवाह म्हणजे उत्क्रांती वाद किंवा लोकशाही समाजवाद आणि दुसरा क्रांतीवादी किंवा प्रागतीकसमाजवाद, त्याशिवायरॉबर्ट ओवेन प्रणित सहकारी समाजवाद, श्रमिकसंघवाद, फेबियन समाजवाद, व्यवसाय संघवाद हे सर्व प्रकार आढळतात. 19 व्या शतकामध्ये भारतातील साम्यवादी विचारसरणी अनेक लोकांनी मांडले त्यामध्ये प्रामुख्याने पंडित जवाहरलाल नेहरू, राम मनोहर लोहिया, आचार्य जावडेकर हे होते. यासर्वांच्या विचारांच्या पलीकडे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या समाजवादाची मांडणी भारतात केली तो समाजवाद राज्य समाजवाद म्हणून ओळखला गेला. समकालीन समाजवादी विचार आणि चळवळींबद्दल ते अतिशय जागरूक होते. राजकीय लोकशाहीला धक्का न लागू देता सामाजिक, आर्थिक परिवर्तनाची धोरणे राबवण्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील राहिले.आर्थिक लोकशाही निर्माण केल्याशिवाय संसदीय लोकशाही यशस्वी होणार नाही असे डॉ. आंबेडकर म्हणत. त्यांचा यांत्रिकीकरणाला विरोध नव्हता. कारण यांत्रिकीकरण किंवा औद्योगिकीकरणामुळे सामाजिक आणि आर्थिक परिणाम दिसून येतात परंतु याचा दोष केवळ यांत्रिकीकरणाला देता येणार नाही, कारण हा दोष मुख्यतः चुकीच्या सामाजिक रचनेचा आहे असे बाबासाहेब म्हणतात. त्यामुळेयंत्राचा निषेध करून चालणार नाही तर समाजरचनाच बदलली पाहिजे.2

## मागील संशोधनाचा आढावा:

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणेखंड 1 (संकलन - वसंतमून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र सरकार) यांनी संकलित पुस्तकात बाबासाहेबांनी अल्पसंख्यांक आणि भारतीय राज्ये हे दोन प्रमुखमुद्दे आणि त्याच बरोबर अल्पसंख्यांक व अनुसूचित जातीच्या लोकांच्या संरक्षणा संदर्भाने देखील मुद्दे उपस्थित केले आहेत.3
2. विनयखेमावाघ यांच्या शोधप्रबंधात त्यांनी राजकीयव शासकीय पातळीवर राज्य समाजवादाचा विचार, देशातील शेतकरी आत्महत्या, जातीयवाद आणि बाबासाहेबांच्या विचारांकडे काही अंशी झालेले दुर्लक्षयांवर विशेष लक्ष दिलेले आहे.4
3. Bagde, Dr. Rakshit, राज्यसमाजवाद आणि कल्याणकारी राज्य (State Socialism and Welfare State) (August 9, 2021). SSRN:https://ssrn.com/abstract=3901813 or http://dx.doi.org/10.2139/ssrn.3901813 यामध्ये लेखक समाजवादाचा बुद्धतत्वज्ञानाशी जोडकशी आहे हे सांगतो तसेच बाबासाहेबांचा राज्यसमाजवाद म्हणजे समाज उद्धाराचे अर्थकारण व कल्याणकारी राज्याचे अर्थशास्त्र आहे हे स्पष्ट करतो.5
4. Dr. Ambedkar's Theory of State Socialism, International Research Journal of Social Sciences(vol.2(8), 34-41 August 2013) by Badal Sarkar सदर संशोधन पत्रिकेत लेखक राज्य समाजवाद हाकसा स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वया पायावर उभा आहे हे स्पष्ट करतो.6

## संशोधनपद्धती

प्रस्तुत शोधलेखासाठी ग्रंथालयीन अभ्यास प्रणालीप्रमाण मानून शोधनिबंधाच्या गरजेप्रमाणे आवश्यक त्याठिकाणी वर्णनात्मक/ विश्लेषणात्मक अभ्यास पद्धतीचा स्वीकार करण्यात आला आहे.

**i) उद्देश**

1. भारतीय समाज व्यवस्थेतील राज्य समाजवाद रुजला का हे तपासणे.
2. भारताची समकालीन समाजव्यवस्था आर्थिक, सामाजिक, राजकीय व नैतिक अशा दृष्टीने समाजवादाच्या आशयाशी सुसंगत आहे का हे तपासणे.
3. राज्य समाजवादन स्वीकारल्यास होणारे नुकसान तपासणे.
4. राज्य समाजवादाची भारतीय परिक्षेपात उपयुक्तता तपासणे.

**ii) प्रदत्त (Data):**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्रलेखिय साधनांचा वापर करण्यात आला असून शक्यतो प्रकाशित साधनांवर भर दिला आहे.

**विश्लेषण (Analysis)**

बाबासाहेब आंबेडकरांच्या स्टेट अँड मायनॉरिटीज याची मूळ इंग्रजी निवेदन बाबासाहेबांनी घटना समितीला सादर केले होते. फ्रेमिंग ऑफ इंडियास कॉन्स्टिट्यूशन या ग्रंथाच्या पृष्ठ क्रमांक 84 ते 114 या पानांवर ते छापून आलेले आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या प्रास्तनासह हे निवेदन पुस्तक रूपाने 1947 मध्ये प्रकाशित केले. तो पर्यंत संस्थानांचा विचार करणाऱ्या समितीचे गठन करण्यात आले होते. परंतु बाबासाहेबांना त्या समितीवर घेण्यात आलेले नव्हते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूळ इंग्रजी पुस्तकात दिनांक 15 मार्च 1947 ला लिहिली. ज्यात घटना समितीला भेडसावणाऱ्या दोन जटिल प्रश्नांसंबंधी त्यांनी विवेचन केले आहे. तेम्हणतात की, "ज्याला घटना समितीला तोंड द्यावे लागणार आहे अशा अनेक समस्यांपैकी दोन गोष्टी सर्वात दुष्कर आहेत याची सर्वांना जाणीव आहे. पहिली समस्या अल्पसंख्यांकाची आहे, तर दुसरी भारतीय संस्थानांसंबंधी आहे.7

स्वातंत्र्य समता आणि बंधुता या तत्त्वावर आधारित जीवन मार्ग म्हणजे सामाजिक लोकशाही होय. जरसमाजात सामाजिक समता नसेल तर स्वातंत्र्याला काहीच अर्थ उरत नाही. कारणत्यातून काही मूठभर लोकांचे राज्य प्रस्थापित होऊन समता ही स्वातंत्र्य शून्य होते व त्यामुळे व्यक्तीच्या जीवनातील स्वयं प्रेरणा नष्ट होते. त्याचप्रमाणे बंधूभाव नसेल तर सहाजिकच स्वातंत्र्य आणि समता यांचीही वाढ होणार नाही. म्हणून आपण हे मान्य करायला हवे की समाजात दोन गोष्टींचा अभाव त्यामध्ये सामाजिक समता आणि आर्थिक समता. अशाप्रकारे आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या स्टेट अँड मायनॉरिटीज या ग्रंथामध्ये राज्य समाजवादाची संकल्पना मांडली.

स्टेटअँड मायनॉरिटी अनुच्छेद दोन खंड चार आर्थिक शोषणाविरुद्ध संरक्षण यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्ट करतात की, याखंडाचा उद्देश राज्यावर लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियमन करण्याचे बंधन टाकणे असा आहे. याखंडात मांडलेल्या योजनेत शेतीचे राष्ट्रीयकरण, सामुदायिक पद्धतीचा कृषी उद्योग तसेच उद्योगधंद्यात सुधारित असा राज्य समाजवाद सुचवलेला आहे. यातरतुदीद्वारे शेती करिता तसेच उद्योग धंद्यांना आवश्यक असलेले सर्व भांडवल पुरवण्याची जबाबदारी राज्याच्या (State Socialism) खांद्यावर येते. राज्यानेभांडवलाचा पुरवठा केल्याशिवाय शेती अथवा उद्योग यांच्याकडून विशेष लाभ अपेक्षिता येणार नाही.यायोजनेची दोन वैशिष्ट्ये आहेत. पहिले म्हणजे आर्थिक जीवनाच्या महत्त्वाच्या क्षेत्रात या तरतुदींद्वारे राज्य समाजवाद सुचवण्यात आलेला आहे. आणिदुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे राज्य समाजवादाची स्थापना विधिमंडळाच्या मर्जीवर सोपवलेली नाही, राज्य समाजवाद हा संविधानाच्या कायद्यानुसार तयार होणार आहे आणि त्यामुळे विधानमंडळ अथवा कार्यकारिणी यांच्या कोणत्याही कायद्याने राज्य समाजवादाला बदलता येणार नाही.

डॉ. आंबेडकरांची लोकशाहीवर नितांतश्रद्धा असूनही त्यांनाही पद्धत सदोष व अपूर्ण वाटत होती. त्यासंबंधी त्यांचे म्हणणे असे होते की, "लोकशाहीही प्रौढ मतदानाच्या तत्त्वावर उभी असते. परंतुप्रौढ मतदानाच्या पद्धतीत सुद्धा विधिमंडळावर आणि सरकारवर श्रीमंत वर्गाचे नियंत्रण असते. ज्यांच्या हातात आर्थिक सत्ता असते त्यांच्या हातात राजकीय सत्ता जाणार हे सांगायला काल मार्क्सने पुन्हा जन्म घेण्याची आवश्यकता मला वाटत नाही. गरीबजनतेच्या हिताचे संरक्षण करण्याची जबाबदारी अशा विधिमंडळावर व सरकारी यंत्रणेवर सोपवणे म्हणजे शेळ्या मेंढ्यांचा कळप लांडग्यांकडे राखायला देण्यासारखे आहे. असेहोऊ नये म्हणून काय केले पाहिजे याचा विचार गंभीरपणे अद्याप कोणी करत नाही याचे मला दुःख वाटते. 8

भारतीय राज्यघटनेत आपले आर्थिक धोरण कसे निश्चित करावे यासंबंधीच्या कलमांचा त्यांनी जो आराखडा तयार केलेला होता तो जिज्ञासूंनी मुळातच अभ्यासण्यासारखा आहे. परंतुती सर्व कलमे प्रत्यक्ष राज्यघटना तयार करीत असताना उपेक्षितच राहिली.9

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेलीराज्य समाजवादाची संकल्पना ही केवळ राजकीय नाही तर आर्थिक स्वरूपाची देखील आहे. ज्यांना संपूर्ण समाजाची आर्थिक घडी राज्य समाजवादाच्या तत्त्वावर उभारायची आहे. त्यांनीएक बाब ध्यानात ठेवलीच पाहिजे. ती म्हणजे एवढे महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य करण्याचे काम सामान्य कायद्यावर सोपवून भागणार नाही. कारण असे कायदे बनवण्याचे व तोडण्याचे अधिकार बहुमताला असतात व या बहुमताचे राजकीय भविष्य विवेक पूर्ण धोरणाने ठरत नसते. यासर्व कारणांमुळे संसदीय लोकशाही ही राज्य समाजवादाकरता पोषक ठरत नाही.

मगयावर पर्याय काय? पर्याय हुकूमशाही हाच आहे. राज्यसमाजवादाला विकसित करण्याकरता जे स्थैर्यहवे ते हुकूमशाही प्रदान करू शकते याबद्दल शंका नाही. परंतु हुकूमशाहीत एका गोष्टीला तोंड द्यावे लागणार. जे व्यक्ती स्वातंत्र्यावर विश्वास ठेवतात ते हुकूमशाहीला कडाडून विरोध करतात व मुक्त समाजाकरीता संसदीय लोकशाही ही राज्यपद्धती योग्य असे प्रतिपादन करतात. कारणत्यांना वाटते की, संसदीय लोकशाही अंतर्गत व्यक्तीला स्वातंत्र्य लाभु शकते, हुकूमशाहीत नव्हे. त्यामुळे ज्यांना हे स्वातंत्र्य हवे आहे जे संसदीय लोकशाही राज्यपद्धती सोडायला तयार नाहीत. अशा लोकांना राज्य समाजवाद आणण्याची कितीही उत्सुकता असली तरी, ते संसदीय लोकशाहीच्या मोबदल्यात हुकूमशाही स्वीकारायला तयार नाहीत. मुद्दा असा आहे की, हुकुमशाहीवाचून राज्य समाजवाद आणायचा आणि राज्य समाजवादासोबत संसदीय लोकशाही पण ठेवायची. मग या करता एकच मार्ग आहे तो म्हणजे संसदीय लोकशाही तर ठेवायची, परंतु राज्य समाजवादाला बदलणे, स्थगित करणे अथवा त्याचा संकोच करणे हे संसदेतील कोणत्याही बहुमताच्या आवाक्यात राहणार नाही. म्हणजेच राज्य समाजवाद हा संविधानिक कायद्याद्वारे अंमलात आणायचा. याच एकमेव मार्गाने आपण तिहेरी हेतू साध्य करू शकतो. तो म्हणजे राज्य समाजवादाची स्थापना संसदीय लोकशाहीचा स्वीकार आणि हुकूमशाहीला नकार.10

स्टेटअँड मॅनॉरिटीज मधील अनुच्छेद 42 विभाग 4 मधील तरतुदींना स्पष्ट करताना आणि त्या विरोधातील विचारांना उत्तर देताना बाबासाहेब म्हणतात की, अस्पृश्यहे अन्य अल्पसंख्याकांपेक्षा वेगळे आहेत. अन्य नागरिकांची मूलभूत हक्क अल्पसंख्यांकांच्या संरक्षण विषयी तरतुदी आणि शिवाय खास संरक्षण विषयक तरतुदी अस्पृश्यांना मिळण्यात माझी मागणी पूर्णतः न्याय आहे.11 अस्पृश्यांची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अवस्था अन्य अल्पसंख्य व सामान्य नागरिकांपेक्षा इतकी निकृष्ट दर्जाचे आहे की, अन्य नागरिकांना मिळणारे संरक्षण तर त्यांना मिळालाच हवे. शिवाय बहुसंख्यांकांच्या अन्याय व अत्याचारापासून संरक्षण मिळण्याकरता त्यांना खास तरतुदींची आवश्यकता आहे.

भारतात उद्भवलेल्या परिस्थितीचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, भारताचीवाढती लोकसंख्या ही सर्वसामाजिक समस्यांचे मूळ आहे. उदाहरणार्थमहागाई, गरिबी, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार इत्यादींचा संबंध हा वाढत्या

लोकसंख्येची आहे. बाबासाहेबांना आपल्या देशातील दारिद्र्याबद्दल तीव्र चिंता वाटत होती. दारिद्र्यनिवारण करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे असे ते मानत. दारिद्र्याच्या त्रासामुळे गुन्हेगारी वाढते, मुले चोऱ्या करून लागतात. दारिद्र्यामुळे अनैतिकता बळावते, वेळेवरलग्न करणे शक्य होत नाही त्यामुळे अनेक रोगांना व अनिष्ट सवयींना लोक बळी पडतात. म्हणूनदारिद्र्य निवारणासाठी लोकसंख्या निवारण करणे त्यांना आवश्यक वाटत होते.12

राष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये शासनाची प्रभावी भूमिका व त्यासाठी आर्थिक नियोजन या गोष्टी समाजवादात अपरिहार्यपणे येतात व बाबासाहेब आंबेडकरांनाही त्या अभिप्रेत होत्या त्यांच्या या पुस्तिके वरून आर्थिक संरचनेची चौकट लक्षात येते. त्यामध्ये त्यांनी शेतीचे क्षेत्र, उद्योग क्षेत्र आणि भीमा क्षेत्र यामध्ये शासनाची भूमिका कशी महत्त्वाची असेल याची रूपरेषा दिलेली आहे.

शेती मधील भूमी सुधारणा अयोग्य वाटत असल्यामुळे त्यांनी शेती करण्याची वेगळी पद्धत सुचवली होती. राज्याचीमालकी असलेल्या शेतीमध्ये सामुदायिक पद्धतीची लागवड करणे हा त्यांच्या विचारांचा मूलभूत आधार होता. सामुदायिकशेती अमलात कशी आणावी याचा मुद्देसूद विचार देखील त्यांनी मांडला.13 उद्योगांच्या संदर्भाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, जेउद्योग आधारभूत आणि मूलभूत आहेत किंवा तसे ठरवण्यात येईल त्यांची मालकी व संचालन शासनाच्या हाती असावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा असा आग्रह होता की, राज्यसमाजवादी संरचना ही संविधानाचा अंगभूत भाग म्हणून अस्तित्वात यावी. त्याचीसंरचना ही मिश्र अर्थव्यवस्थेची नसून संसदीय लोकशाहीच्या चौकटीतील समाजवादाची होती.14 जेणेकरूनही संरचना बहुमताच्या आधारावर बदलता येणार नाही. मूलभूत उद्योगांवर राज्याची मालकी प्रस्थापित असेल तर, जास्तीतजास्त लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकेल. त्यामधूनलोकांची गरीबी दूर होण्यास मदत होऊन रोजगाराची सुरक्षितता आणि शाश्वती निर्माण होईल.

भारतातीलसर्व प्रौढ व्यक्तींसाठी आयुर्विमा अनिवार्य असावा असे बाबासाहेब आंबेडकरांची मत होते. रोजच्या उदरनिर्वाहासाठी शाश्वती नसलेल्या व्यक्तींसाठी सामाजिक सुरक्षा मिळणे कठीणच असते. यातरतुदीमुळे व्यक्तींप्रमाणे शासनाचाही फायदा झाला असता, कारण विम्याच्या हप्त्याची जमा होणारी रक्कम विकास कार्यासाठी वापरून सार्वजनिक कर्जाचा भार कमी करता आला असता. 15

राज्य समाजवादाचा गाभा असणाऱ्या दोन तरतुदी आपल्या देशाने लागू केल्याच नाहीत. एकजमिनीवर शासनाची मालकी, सामुदायिक शेतीआणि दुसरी म्हणजे भविष्यकाळात राज्य समाजवादी तरतुदींना सत्तेतील लोकांना आपल्या बहुमताच्या आधारावर बदलता येऊ नये. म्हणजेच आज आपण भारतीय संविधानात जी कल्याणकारी राज्याची संकल्पना राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे या भागामध्ये पाहतो त्यांचा स्वीकार मूलभूत हक्कांमध्ये व्हायला हवा होता. जेणे करून राज्याकरवी त्यांचा भंग झाल्यास न्यायालयात धाव घेता आली असती. पण सध्या राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा भंग झाल्यास आपण कोर्टात धाव घेऊ शकत नाही सध्या ते राज्यावर बंधनकारक नाहीत.

## निष्कर्ष:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेला राज्य समाजवाद यादेशातील अनेक तत्कालीक नेत्यांना न रुचल्यामुळे त्याकाळी राज्य समाजवादाच्या ऐवजी लोकशाही समाजवाद आला.

भारताची समकालीन समाजव्यवस्था आर्थिक, सामाजिक, राजकीय व नैतिक समस्या सोडवण्यासाठी व समाजात आर्थिकक्षमता, आणि समता प्रस्थापित करण्यासाठी एक अतिशय प्रभावी उपाय आहे.त्यांचे हे परिवर्तनवादी विचार अशा कोणत्याच दृष्टीने समाजवादाच्या आशयाशी सुसंगत नाही. कारण सामाजिक देवाण - घेवाण आणि मानवी समानता या गोष्टी त्या व्यवस्थेतच नाहीत. चातुर्वर्ण्याची पध्दती समाजाच्या शक्तींचे खाच्चिकरणकरते. चातुर्वर्ण्य

व्यवस्था व्यक्तीवर सक्तीने व्यवसाय लादतेत्यामुळे एकंदरीत समाजाच्या उत्पादन क्षमतेवर त्याचा विपरीत परिणाम होतो. भारतातील जातीव्यवस्था नुसती श्रमविभागणी करून थांबत नाही, तर व्यवसायाची निवड करण्याचे स्वातंत्र्य ही व्यक्तीला देत नाही. या गोष्टींचे उच्चाटन केल्याशिवाय या देशात समाजवाद टिकून राहू शकणार नाही, असे बाबासाहेबांचे मत होते.15

भेदभाव एकजिनसी समाज निर्माण होऊ देत नाही. धर्म, वंश, जात अशा कोणत्याही कारणाने केलेला भेदभाव बाबासाहेबांना मान्य नव्हता. विशेषतः भारतासारख्या देशात या भेदभावाचे संपूर्ण उच्चाटन होणे त्यांना आवश्यक वाटत होते. भारतासाठी समाजवादाचा संदर्भ आर्थिकतेपेक्षा सामाजिकच अधिक आहे. माणसाच्या वर्तमान समस्या सोडवण्या ऐवजी माणसाला माणसापासून दूर ठेवण्याऱ्या बंधनांना तोडण्यात इथला समाजवाद कितपत यशस्वी होतो हे पाहणे अधिक महत्वाचे आहे. "16

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1947 मध्ये सरकारला जे निवेदन सादर केले होते, त्यामध्ये सरकारला राज्य समाजवाद स्वीकारण्याची शिफारस केली होती. त्यांनी मांडलेल्या राज्य समाजवादाच्या योजनेकडे त्या वेळच्या सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्ष केले. त्याचे दुष्परिणाम म्हणून आज देशाला अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे देशाच्या प्रगतीमध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे. भरमसाठ इंधन वाढ, अन्नधान्याच्या किमतीमधील वाढ, बेरोजगारी मधील वाढ, नापिकी आणि कर्जामुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. गरीबी भूकबळीला कंटाळून समाजातील तरुण वर्ग निराशेपोटी नक्षलवाद व दहशतवादाच्या विळख्यात ओढला जात आहे. माणूस धर्मांधतेच्या आहारी गेल्यामुळे जातीयता वाढीस लागली आहे. त्यामुळे समाजातील एकात्मता धोक्यात आली आहे.

या सर्व समस्यांचा विचार केल्यास राज्य समाजवादाची योजना या समस्यांवरील प्रभावी उपाय होऊ शकतो.ग्रामीण सुधारणा घडवून शहरी व ग्रामीण विकासात समतोल साधणे, जातिमुक्त समाज निर्माण करणे, सहकारी शेतीला प्रोत्साहन देणे त्याचप्रमाणे धनिक वर्गाचा मानवी -घडामोडींकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलून त्यांना सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणे अशा विविध उपाययोजनांव्दारे समाजाची वाटचाल निर्वेधपणे करता येईल असे बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. त्यादृष्टीने त्यांनी राज्यघटनेमध्ये मार्गदर्शक तत्वांचा समावेश करून या तत्त्वांना समाजवादाचे व आर्थिक लोकशाहीचे दीपस्तंभ मानले होते.

## मर्यादा:

राज्य समाजवाद हा प्रामुख्याने आर्थिक विचार असून समता प्रस्थापित करण्यासाठीत्याचा स्वीकार करणे आवश्यक होते. परंतुतसे न झाल्यामुळे देशात मोठ्या प्रमाणात विषमता वाढलेली आपणास दिसून येते. त्याचापरिणाम आजही भारतात समानता प्रस्थापित होण्यास व आर्थिक लोकशाही निर्माण होण्यात अडथळे येताना दिसून येतात.

## संदर्भ:

1.https://mr.m.wikipedia.org/wiki/%E0%A4%B8%E0%A4%AE%E0%A4%BE%E0%A4%9C%E0%A4%B5%E0%A4%BE%E0%A4%A6. समाजवादाची व्याख्या.

2.डॉ बाबासाहेब आंबेडकर, राज्य आणि अल्पसंख्यांक, प्रस्तावना, रोडगे प्रकाशन, नागपूर

3.डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड 1(संकलन - वसंत मून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र सरकार)

4.विनय खेमा वाघ, शोधप्रबंध, (नोंदणीक्र. NMU/11/Ph.D/Pol.Sci./43/2012) "भारताच्यापुनर्रचनेतडॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्यसमाजवादाचे योगदान – एकविश्लेषणात्मक अध्ययन" उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

5.Bagde, Dr. Rakshit, राज्यसमाजवाद आणि कल्याणकारी राज्य (State Socialism and Welfare State) (August 9, 2021). SSRN:https://ssrn.com/abstract=3901813 or http://dx.doi.org/10.2139/ssrn.3901813
6.Badal Sarkar, Dr. Ambedkar's Theory of State Socialism, International Research Journal of Social Sciences(vol.2(8), 34-41 August 2013).
7.डॉ बाबासाहेब आंबेडकर, राज्य आणि अल्पसंख्यांक, प्रस्तावना, रोडगे प्रकाशन, नागपूर.
8.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राज्य आणि अल्पसंख्यांक, अनुच्छेद 2, भाग 2, खंड 4, रोडगे प्रकाशन, नागपूर.
9.Moon Vasant (Edited), Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol I, Dr. Babasaheb Ambedkar Source Material Publication Committee, Education Department, Govt. of Maharashtra Mumbai 1982 page 410
10.Moon Vasant (Edited), Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol I, Dr. Babasaheb Ambedkar Source Material Publication Committee, Education Department, Govt. of Maharashtra Mumbai 1982, Page 411.
11.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राज्य आणि अल्पसंख्यांक, अनुच्छेद 2, भाग 2, खंड 4, रोडगे प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्रमांक - 36.
12.प्रा. सौदामिनीराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकरगौर व ग्रंथ, दयापवार (संपादकमंडळ) महाराष्ट्रराज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, तृतीयआवृत्ती 2009, पृष्ठक्रमांक 116..
13.विजय कविमंडण, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य समाजवाद, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, अर्थसंवाद, एप्रिल ते जून 2016, खंड 40, अंक 1, यवतमाळ, पृष्ठ क्रमांक 6.
14.विजय कविमंडण, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य समाजवाद, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, अर्थसंवाद, एप्रिल ते जून 2016, खंड 40, अंक 1, यवतमाळ, पृष्ठ क्रमांक 7.
15.Jatawa D.R, The Political Philosophy of B.R. Ambedkar, Phonix Publishing Agency, Agra - 1965, Page -78.
16.Jatawa D.R, The Political Philosophy of B.R. Ambedkar, Phonix Publishing Agency, Agra - 1965, Page -243..



**अनिकेत रविंद्र उबाळे**
**सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, पनवेल, नवी मुंबई.**